**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)**
**गणेशखिंड, पुणे**

**Media Co-ordination Cell**
Ganeshkhind, Pune-7

**01/12/2021**

## ३४० महाविद्यालयांमध्ये 'इनोव्हेशन टू एंटरप्राइजेस' स्पर्धेला सुरुवात

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ: २००० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

पुणे,दि.२९- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'इन्फोफेस्ट २०२२' मधील 'इनोव्हेशन टू एंटरप्राइजेस' या नवकल्पनांना प्रोत्साहन देणाऱ्या स्पर्धेला पुणे, अहमदनगर व नाशिक येथील संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरुवात झाली आहे. ३४० महाविद्यायतील प्रतिनिधींनी यात सहभाग घेतला आहे.

विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाकडून दरवर्षी 'इनोफेस्ट' या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या स्टार्टअप विषयक कल्पना प्रत्यक्षात आणण्याची संधी या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाते. यासाठी महाविद्यालयांमध्ये 'स्टार्टअप इनोव्हेशन सेल' स्थापन करण्यात आले आहे. यावर्षी १०० महाविद्यालये यामध्ये नव्याने जोडली गेली आहेत.

याबाबत माहिती देताना विभागाच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर म्हणाल्या, या ३४० महाविद्यालयातून प्रत्येकी २ टीम असणार आहेत. प्रत्येक टीममध्ये साधारण ३ ते ४ विद्यार्थ्यांचा सहभाग असेल. या सर्व विद्यार्थ्यांची महाविद्यालय स्तरावर पहिली फेरी होईल. त्यानंतर त्यांच्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात येईल. यातून निवडलेल्या विद्यार्थ्यांची 'क्लस्टर लेव्हल' स्पर्धा घेण्यात येईल. त्यातून टॉप १०० टीमची निवड केली जाईल. या १०० टीमसाठी ३ दिवसीय 'बूट कॅम्प' चे आयोजन करण्यात येणार असून त्यांना संबंधित विषयातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येईल. त्यातून २५ ते ३० टीमचे स्टार्टअप निवडून त्यांच्यामध्ये विद्यापीठ स्तरावरील स्पर्धा होईल त्यातून निवड झालेल्या २ स्टार्टअप टीम ला रोख पारितोषिक तर उर्वरित टीमला प्री-इंक्युबेशन प्रशिक्षण देण्यात येईल. यातील ४० चांगल्या स्टार्टअपना मार्गदर्शन तर काहींना विद्यापीठाच्या नवोपक्रम केंद्रात काम करण्याची संधी मिळेल. तसेच यांचे व्यवसायात रूपांतर होईपर्यंत या स्टार्टअपला पाठिंबा दिला जाईल असेही डॉ. पालकर यांनी सांगितले.

मागील वर्षी कोव्हिडच्या पार्श्वभूमीवर हा फेस्टिव्हल ऑनलाइन पध्दतीने पार पडला होता. यंदा ऑनलाइन तसेच ऑफलाईन अशा दोन्ही पध्दतीने ही स्पर्धा पार पडणार आहे.

विद्यार्थ्यांची क्रयशक्ती आणि त्यांच्यातील उद्योजकीय मानसिकता वाढवी या दृष्टीने ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेत सहभागी झालेली महाविद्यालये या प्रेरणेतून काही उपक्रम सुरू करू शकतील.

**- डॉ. अपूर्वा पालकर, संचालिका**
**नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

-------

## 'Innovation to Enterprises' competition started in 340 colleges

### Savitribai Phule Pune University: More than 2000 students participated

Pune, Dec 29: Savitribai Phule Pune University's 'Innofest 2022' competition promoting 'Innovation to Enterprises' has started in affiliated colleges in Pune, Ahmednagar and Nashik. Representatives from 340 colleges have participated in it.

The Innofest competition is organized every year by the Department of Innovation, Incubation and linkages of the University. Through this, students are given the opportunity to realize their startup ideas in college. For this, 'Startup Innovation Cell' has been set up in colleges. This year, 100 new colleges have been added.

While giving information about this, the director of the department Dr.Apoorva Palkar said that there will be 2 teams from each of these 340 colleges. Each team will consist of about 3 to 4 students. All of these students will have their first round at the college level. After that a guidance program will be conducted for them. A 'cluster level' competition will be held for the selected students. The top 100 teams will be selected. A three day 'boot camp' will be organized for these 100 teams and they will be guided by experts in the relevant field. Out of these, 25 to 30 startups will be selected and they will compete at the university level. Out of these, 2 selected startup teams will be given cash prizes and the rest will be given pre-incubation training, Palkar said.

Top 40 startup ideas from this competition will be nurtured further by pre incubation and top ones will find a place in incubation centre of the university . Attempt is to spot ideators and support them till commercialisation unlike other competitions that finish only with winners Dr Palkar added.

Last year, the festival was held online on the backdrop of Covid 19. This year the competition will be held both online and offline.

"promoting thinking skills and building entrepreneurial mindset is the objective behind this activity. 340 colleges who have started innovation cells will kick startter activities using this competition".

**- Dr. Apoorva palkar, Director,**
**Innovation, incubation and linkages, SPPU**

-------